# मा. मंत्री (वित्त) श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी शुक्रवार, दिनांक १८ मार्च २०१६ रोजी केलेल्या अर्थसंकल्पीय भाषणाची ठळक वैशिष्ट्ये.

**भाग–१**

हा अर्थसंकल्प शेतकरी राजासाठी समर्पित असून, आर्थिक वर्ष २०१६-१७ हे "शेतकरी स्वाभिमान वर्ष" म्हणून साजरे करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे व त्यासाठी कृषी क्षेत्र आणि शेतकरी यांच्या विविध योजनांसाठी शासनाने सुमारे २५ हजार कोटी रुपये इतकी भरीव तरतूद केलेली आहे.

❖ **दुष्काळ निवारण**

- पीक विमा योजनेसाठी २०१६-१७ मध्ये १ हजार ८५५ कोटी रुपये इतकी भरीव तरतूद
- शेततळी, विहिरी व विद्युतपंप जोडणी यासाठी २००० कोटी रुपये इतकी भरीव तरतूद करण्यात आली असून, या निधीतून १ लाख शेततळी, ३७ हजार ५०० विहिरी व ९० हजार विद्युत पंप जोडण्या उपलब्ध केल्या जातील.
- पूर्व विदर्भातील नक्षलग्रस्त जिल्ह्यात ६ हजार ८६२ माल गुजार तलावांचे नूतनीकरण करण्याचे नियोजन
- नवीन "पालक मंत्री पांधण रस्ते योजना" तसेच पालकमंत्री अर्थमूव्हिंग मशिन्स खरेदी योजना सुरु करुन त्याद्वारे पांधण रस्ता दुरुस्तीची कामे ग्रामीण युवकांना सोपवणार

❖ **कृषी**

- शेतकऱ्यांसाठी अल्प व्याज दराने पीक कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी ११० कोटी रुपये इतका नियतव्यय
- तेलबिया व कडधान्याच्या उत्पादकेत वाढ व्हावी यासाठी राष्ट्रीय कृषी विकास माध्यमातून ८० कोटी रुपये इतका नियतव्यय
- कृषी प्रक्रिया उभारण्यासाठी प्रकल्प खर्चाच्या २५ टक्के किंवा ५० लाख रुपयांपर्यंत अनुदान देण्याची नवीन योजना
- "पंडीत दिनदयाळ उपाध्याय कृषी मार्गदर्शक योजना" या प्रस्तावित नवीन योजनेसाठी ६० कोटी रुपये इतका नियतव्यय

- कृषी संशोधन व शिक्षणास चालना देण्यासाठी बुलढाणा व अहमदनगर जिल्ह्यात शासकीय कृषी महाविद्यालय तर जळगाव जिल्ह्यात शासकीय उद्यानविद्या महाविद्यालय सुरु करण्याचा मानस
- जळगाव व अकोला येथे प्रत्येकी एक याप्रमाणे दोन नवीन पशुवैद्यकिय महाविद्यालय स्थापन करण्यासाठी रुपये १० कोटी इतका नियतव्यय
- शेती क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञानाच्या आदानप्रदानाद्वारे शेतकऱ्यांना प्रशिक्षित करण्यासाठी कृषी गुरुकूल ही नवीन योजना राबविण्याचा निर्णय
- प्रत्येक जिल्ह्यात कृषी महोत्सव आयोजित करुन शेतकऱ्यांना शेती विषयक माहिती देण्यासाठी उपक्रमाचे आयोजन
- सेंद्रीय शेतीला चालना देण्यासाठी राज्यातील ४ कृषी विद्यापीठात "सेंद्रीय शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्राची स्थापना" करण्याचे प्रस्तावित
- हवामानाच्या अचूक अंदाजाद्वारे शेतकऱ्यांना सुयोग्य मार्गदर्शन करण्यासाठी राज्यातील २ हजार ६५ महसूल मंडळ स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्रे स्थापन करण्याचे प्रस्तावित

### ❖ पशुसंवर्धन

- एकात्मिक कृषी विकास कार्यक्रमांतर्गत दुग्धविकास प्रकल्प उभारण्यासाठी शेतकऱ्यांची उत्पादक कंपनी स्थापन करुन १०० कोटी रुपये किमंतीचे प्रकल्प विदर्भ व मराठवाडयात उभारण्यात येणार
- १४ जिल्ह्यात सघन कुक्कूट विकास गटाची स्थापना करण्यासाठी ५१.१३ कोटी रुपयांची तरतूद
- गोवंश संगोपनासाठी वळूमाता संगोपन केंद्राचे नूतनीकरण व आधुनिकीकरण तसेच "गोवर्धन गोवंश रक्षा केंद्र" या नवीन योजनेद्वारे स्वयंसेवी संस्थामार्फत राज्यातील ३४ ग्रामीण जिल्ह्यांमध्ये भाकड गायी व गोवंश संगोपन कार्यक्रम राबविणार
- किनारपट्टीवरील ५ जिल्ह्यांमध्ये विविध ठिकाणी जेट्टी बांधणीचा कार्यक्रमासाठी ३० कोटी रुपये नियतव्यय तसेच ससून गोदी बंदराच्या नूतनीकरणासाठी रुपये १५ कोटी रुपये इतका नियतव्यय

### ❖ सिंचन

- सिंचन प्रकल्पासाठी सन २०१६-१७ मध्ये ७ हजार ८५० कोटी रुपयांची तरतूद
- प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत समावेश झालेल्या विविध ७ प्रकल्पांसाठी २ हजार ७८ कोटी रुपये इतका भरीव नियतव्यय

- पाण्याच्या वापराचे काटेकोर नियोजन करण्यासाठी व समाजात जलसाक्षरता तसेच जलजागृती निर्माण करण्यासाठी “यशदा” पुणे येथे कायम स्वरुपी केंद्र तर चंद्रपूर, औरंगाबाद, अमरावती येथे उपकेंद्रे निर्माण करण्याचे नियोजन

❖ **ग्राम विकास**

- मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत रस्त्यांचा दर्जा सुधारणे व नवीन जोडण्या यासाठी ५०० कोटी रुपये इतका नियतव्यय
- गावांच्या शाश्वत विकासासाठी “स्मार्ट गाव” योजना प्रस्तावित, त्याद्वारे गण, तालुका व जिल्हास्तरावर स्मार्ट ग्रामपंचायतीची निवड करुन प्रोत्साहनपर निधी दिला जाणार
- शासनस्तरावरील निर्णयांची ग्रामीण भागातील सामान्य जनतेला माहिती व्हावी यासाठी सर्व ग्रामपंचायतीमध्ये “डिजिटल बोर्ड” बसविण्याचा मानस
- ग्रामीण व दुर्गम भागातील पाण्याची समस्या सोडविण्यासाठी मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठ्यासाठी महत्वकांक्षी कार्यक्रम शासन हाती घेणार, त्यासाठी ५०० कोटी रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित
- ग्रामीण भागाच्या जलद विकासाच्या दृष्टीने ग्रामपंचायती अधिक सक्षम करण्यासाठी “बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत व महिला सक्षमीकरण अभियान” नवीन योजना प्रस्तावित
- महिलांच्या स्वयंसहाय्यता समूहांना “सुमतीताई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण” या नवीन योजनेद्वारे शून्य टक्के व्याजदराने कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी १० कोटी रुपये इतका नियतव्यय

❖ **वीज निर्मिती व वीज दर**

- वीज निर्मिती प्रकल्पांसाठी रुपये ७८४ कोटी रुपये इतका नियतव्यय
- वीज वितरण प्रणाली सुधारण्यासाठी प्रस्तावित पायाभूत आराखडा योजनेअतंर्गत नवीन २४० उपकेंद्राची उभारणी
- नवीन व नवीकरणीय ऊर्जा स्त्रोतांच्या क्षमतेमध्ये भरीव वाढ करण्यासाठी ४५६ कोटी रुपये इतका भरीव नियतव्यय
- विदर्भ व मराठवाडा येथे नवीन उद्योग यावेत यासाठी औद्योगिक घटकास वीजदरात सवलत देण्यात येईल.

❖ **उद्योग व कौशल्य विकास**

- शासनाने जाहिर केलेल्या औद्योगिक धोरणांतर्गत ११ लाख २३ हजार थेट रोजगार निर्मिती

- विशाल प्रकल्प धोरणांतर्गत ५३ हजार ३३० कोटी २५ लाख रुपयांची प्रत्यक्ष गुतवणूक व ८५ हजार ८४ प्रत्यक्ष रोजगार निर्मिती
- उद्योगांना अधिक चालना देण्यासाठी महाराष्ट्र उद्योजकता परिषदेची स्थापना करणार
- असंघटित कामगारांकरिता एकात्मिक व्यवस्थापन प्रणाली विकसित करण्यासाठी १८ कोटी ९२ लाख रुपयांचा नियतव्यय
- केंद्र शासनाच्या मुद्रा बँक योजनेचा लाभ जास्तीतजास्त तरुणांना मिळण्यासाठी जिल्हास्तरावर समितीचे गठन

❖ **वस्त्रोद्योग व पणन**

- वस्त्रोद्योगास चालना देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांसाठी २६५ कोटी रुपयांचा भरीव नियतव्यय

❖ **पायाभूत सुविधा व रस्ते विकास**

- राज्यातील रस्ते विकासासाठी रस्ते बांधणी क्षेत्रात ४ हजार ५० कोटी रुपये नियतव्यय
- २१ हजार कि.मी लांबीचे रस्ते पुढील आठ वर्षात टप्प्याटप्प्याने सुधारित करण्याचे नियोजन
- राज्य महामार्गावर महिलांसाठी ४०० स्वच्छतागृहे बांधण्यात येणार असून त्यासाठी यावर्षी ५० कोटी रुपये इतका नियतव्यय
- मिहान प्रकल्पातील भूसंपादन व प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी २१६ कोटी ३३ लाख रुपये इतका नियतव्यय
- राज्यातील रेल्वे प्रकल्पातील शासनाच्या सहभागापोटी ६८ कोटी ६० लाख रुपये इतका नियतव्यय

❖ **निवारा**

- “सर्वांसाठी घरे २०२२” या केंद्र पुरस्कृत योजनेच्या अंमलबजावणीसाठी ७०० कोटी रुपये इतका नियतव्यय
- नवीन चंद्रपूर शहराचा जलद गतीने विकास करण्यासाठी १०० कोटी रुपये इतका नियतव्यय
- हक्काचे घर नसलेल्या स्वातंत्र्य सैनिकांना किंवा त्यांच्या पत्नीला राहत्या गावात घर घेण्यासाठी अर्थसहाय्य

❖ **नागरीकरण**

- नगरपरिषदा, नगरपंचायत क्षेत्रात महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी १ हजार कोटी रुपये इतका नियतव्यय

- नागपूर व पूणे मेट्रो प्रकल्पाच्या कामास गती देण्यासाठी एकूण १८० कोटी रुपये इतका नियतव्यय
- मुंबई मेट्रो ३ प्रकल्पासाठी यावर्षी ९० कोटी ४७ लाख रुपये इतका नियतव्यय
- ८ शहरांसाठी स्मार्टसिटी प्रकल्प राज्य शासनाच्या माध्यमातून राबविणार
- महाराष्ट्र अग्नीसुरक्षा अभियानासाठी ३० कोटी रुपये इतका नियतव्यय
- मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, कल्याण, डोंबिवली अशा शहरांमधून केवळ महिलांसाठी "तेजस्वीनी" बसेसची व्यवस्था

❖ **आरोग्य**

- राष्ट्रीय आरोग्य अभियानासाठी केंद्र व राज्य हिस्सा मिळून ९७० कोटी ३७ लाख रुपये इतका नियतव्यय
- शहरी व ग्रामीण भागातील आरोग्य सेवांच्या बांधकामासाठी २३३ कोटी ८० लाख रुपये इतका नियतव्यय
- राजीव गांधी जीवनदाय आरोग्य योजनेसाठी ३०० कोटी रुपये इतका नियतव्यय

❖ **शिक्षण व क्रीडा**

- सर्व शिक्षा अभियानाच्या अंमलबजावणीसाठी ७४० कोटी रुपये व संगणक प्रशिक्षण कार्यक्रमासाठी १८० कोटी रुपये इतका नियतव्यय
- राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानांतर्गत माध्यमिक शाळेत जाणाऱ्या मुलामुलींच्या गुणवत्तापूर्वक शिक्षणासाठी १३७ कोटी ४४ लाख रुपये इतका नियतव्यय
- मुलींच्या वसतिगृहासाठी ५० कोटी रुपये इतका नियतव्यय
- ४३ सार्वजनिक ग्रंथालयाचे रुपांतर ई ग्रंथालयात करण्यासाठी प्रत्येकी ४० लाख रुपये याप्रमाणे १७ कोटी २० लाख रुपये खर्च करणार
- सन २०२० मध्ये होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धेत भाग घेणाऱ्या राज्यातील खेळाडूंसाठी ३ कोटी रुपये इतका नियतव्यय
- अमरावती येथील श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ या संस्थेला शताब्दी वर्षानिमित्त १ कोटी रुपयांचे अर्थसहाय्य

❖ **सुरक्षा व वाहतूक**

- पोलींसाना घरे उपलब्ध होण्यासाठी ३२० कोटी रुपयाचा नियतव्यय
- सीसीटिव्ही प्रकल्पासाठी ३५० कोटी रुपयांची तरतूद
- पनवेल, मुंबई, पुणे, सांगली इत्यादी १३ बसस्थानकांचे आधुनिकीकरण
- राज्यातील परिवहन महामंडळाच्या ३५०० निवाऱ्यांची पुर्नबांधणी

- मांडवा येथे रो-रो सेवेच्या पायाभूत सुविधासाठी ३० कोटी ५१ लाख रुपये व लाट रोधक भिंत बांधण्यासाठी ३६ कोटी रुपये प्रस्तावित

❖ **न्यायालयांकरिता पायाभूत सुविधा**

- न्यायालयांसाठी इमारती व न्यायाधीशांसाठी निवासस्थाने बांधण्यासाठी ४९१ कोटी १० लाख रुपयांचा नियतव्यय

❖ **सार्वजनिक वितरण व्यवस्था**

- किमान आधारभूत किंमत खरेदी अंतर्गत विकेंद्रीत धान खरेदी योजनेच्या अंमलबजावणीसाठी ६२ कोटी १४ लाख रुपयांचा नियतव्यय

❖ **वने व पर्यावरण**

- राज्यातील ६ व्याघ्र प्रकल्पातील ६५ गावांच्या पुनर्वसनाचा कालबद्ध कार्यक्रमांतर्गत यावर्षी ६० कोटी रुपयांचा नियतव्यय
- निसर्ग पर्यटनासाठी ४७ कोटी २५ लाख रुपये इतका नियतव्यय
- चंद्रपूर वन प्रशासन व्यवस्थापन व विकास प्रबोधिनीच्या विस्तारासाठी ५ कोटी रुपये इतका नियतव्यय
- राज्यातील कांदळवनाच्या संरक्षण व संवर्धनासाठी द्वतिवर संवर्धन प्रतिष्ठाननच्या माध्यमातून रोजगार व व्यवसाय वृद्घी स्थापन करणार
- राज्यातील चंद्रभागा नदी २०२२ पर्यंत प्रदूषण मुक्त करुन संवर्धन करण्यासाठी “ नमामि चंद्रभागा ” या अभियानासाठी २० कोटी रुपये इतका नियतव्यय

❖ **पर्यटन व सांस्कृतिक कार्य**

- नवीन पर्यटन धोरणांतर्गत पर्यटन स्थळी पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणासाठी २८५ कोटी रुपयांचा नियतव्यय
- औरंगाबाद जिल्ह्यांतील म्हैसमाळ, वेरुळ, खुलताबाद आणि सुलीभंजन या पर्यटन स्थळांच्या विकासावर विशेष लक्ष देणार
- समुद्रकिनारी पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना करणार

❖ **महिला बाल कल्याण**

- राज्यातील मुलींसाठी १ एप्रिल २०१६ पासून “ माझी कन्या भाग्यश्री ” योजना राबविण्यात येणार असून त्यासाठी २५ कोटी रुपये इतका नियतव्यय
- आदर्श अंगणवाडी कार्यक्रमांतर्गत १० हजार अंगणवाड्या आदर्श करण्यासाठी १०० कोटी रुपयांचा नियतव्यय

❖ **आदिवासी विकास, सामाजिक न्याय व अल्पसंख्याक विकास**

- आदिवासी उपयोजनांतर्गत नामांकित शाळा प्रवेशासाठी २९० कोटी रुपये, रस्ते विकास ३०० कोटी, आश्रमशाळा बांधकामासाठी ३७० कोटी रुपयांचा नियतव्यय उपलब्ध

- आदिवासी युवकांसाठी एकलव्य क्रिडा व उद्योजकता प्रबोधिनी उभारण्याकरिता २५ कोटी रुपयांचा नियतव्यय
- वारली कलेच्या जोपासना व संवर्धनासाठी "वारली हट" करिता ६० कोटी रुपयांची तरतूद
- संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना या अंतर्गत अनुदानात वाढ करण्यात येत असून ३३२ कोटी रुपये इतके दायित्व शासन स्वीकारणार.
- अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी विविध योजना राबविण्याकरिता ४०५ कोटी रुपये इतका नियतव्यय
- अनुसूचित जातीच्या कुटूंबाना घरकुल योजनेचा लाभ देण्यासाठी ३२० कोटी रुपये इतका नियतव्यय
- "डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंब योजनेतंर्गत" अनुसूचित जातीच्या शेतकऱ्यांना आर्थिकदृष्टया स्वावलंबी होण्यासाठी विहिर खोदण्यासाठी २ लाख रुपयांपर्यंत अनुदान तसेच विहिरीवर विद्युत पंप बसवून ग्रीड मधून वीज पुरवठा शक्य नसल्यास सौर उर्जेतून वीज पुरवठा
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त "समता व सामाजिक न्याय वर्ष" अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यासाठी १७० कोटी रुपये इतका नियतव्यय
- शासकीय वसतिगृहाच्या बांधकामासाठी २२० कोटी रुपये इतका नियतव्यय

❖ **सुशासन**

- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत १५६ सेवा ऑनलाईन उपलब्ध.
- महाराष्ट्र स्टेट वाईड एरिया नेटवर्कमध्ये सुधारणा करण्यासाठी १० कोटी रुपये इतका नियतव्यय
- "शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार" निधीतून अधिस्वीकृतीधारक पत्रकारांच्या कुटूंबालाही दुर्धर आजारासाठी आर्थिक मदत देणार त्यासाठी मुदतठेवी मध्ये वाढ करुन ती १० कोटी रुपये करण्यात येणार.

❖ **स्मारके**

- महाराष्ट्र राज्याबाहेरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकांसाठी ५ कोटी रुपये इतका नियतव्यय
- राज्यातील सार्वजनिक गणेश मंडळाच्या माध्यमातून लोकमान्यांच्या कार्याविषयी जनजागृती व्हावी यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांकरिता ५ कोटी रुपये इतकी तरतूद.

- गणिततज्ज्ञ भास्कराचार्यांच्या स्मरणार्थ जागतिक दर्जाची “भास्कराचार्य गणित नगरी” तयार करणार.
- राज्याचे माजी गृहमंत्री दिवगंत आर. आर. (आबा) पाटील यांच्या स्मरणार्थ सांगली जिल्ह्यात उभारण्यात येणाऱ्या सभागृहासाठी ५ कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात येणार.
- आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या नावाने सिंधुदूर्ग नगरी ओरोस येथे पत्रकार भवन उभारण्यासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देण्यात येणार.

❖ **मराठी भाषा संवर्धन**

- दुर्मिळ मराठी ग्रंथाचे संगणकीकरण या उपक्रमांतर्गत ९५ पुस्तके व नियतकालिकांचे २५३ सुटे अंक संकेत स्थळावर उपलब्ध.

* * * * *